पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
मा. विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : १०

**सभावृत्तांत**

दिनांक : २१ / ०९ / २०१२ वेळ : दुपारी ३ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक २१ / ०९ / २०१२ रोजी दुपारी ३:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. प्रसाद शेट्टी - सभापती
२) मा. ननवरे जितेंद्र बाबा
३) मा. सुपे आशा रविंद्र
४) मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५) मा. शैलजा शितोळे
६) मा. नेटके सुमन राजेंद्र
७) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा.सावंत - सह आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.शिर्के, मा.पठाण, मा.दुधेकर, मा.जाधव, मा.साळवी, मा.चिंचवडे, मा.लडकत, मा.ढगे, मा.दांगट - कार्य.अभियंता हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.५ :- “ अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी ” पदावर पदोन्नतीने करावयाच्या नेमणुकीस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.६ :- जलक्षेत्र क्र.ड/१२ पिंपळे गुरव परिसरातील गुरुत्व वाहिनीवरील थेट पाणीपुरवठा बंद करणेकामी स.नं.७२ येथे २.० द.ल.लि. क्षमतेची टाकी बांधणे.

विषय क्र.७ :- माती, चिकणमाती, शाडू तसेच प्लास्टर ऑफ पॅरिस पासून तयार केलेल्या देवदेवतांच्या मूर्तीवरील जकात माफ करणेबाबत.

विषय क्र.८ :- चिंचवड येथील प्रादेशिक विज्ञान केंद्र प्रकल्पाच्या उर्वरित सिमाभिंतीचे कामाबाबत.

विषय क्र.९ :- सांगवी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत सांगवी मुळानगर येथे पंप हाऊसच्या मोकळया जागेत रिटेनिंगवॉल व सिमाभिंत बांधणे.

विषय क्र.१०:- वॉर्ड क्र.५ मोरेवस्ती येथे दवाखाना इमारत बांधणेबाबत - मा.जितेंद्र ननवरे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक :- ५३ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २१/०९/२०१२ विभाग :- झोनिपु स्थापत्य
सुचक : मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा. नितीन लांडगे
संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/जा/कावि/८३४/२०१२, दि.०४/०९/२०१२

विषय - वॉर्ड क्र.३५ मोरवाडीमधील (लालटोपीनगर) झोपडपट्टीमध्ये शौचालय बांधणेचे काम थेट पध्दतीने मे. सुलभ इन्टरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन या संस्थेस देणेबाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ५४ विषय क्रमांक :- २
दिनांक :- २१/०९/२०१२ विभाग :- झोनिपु स्थापत्य
सुचक : मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा. नितीन लांडगे
संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/जा/कावि/८३३/२०१२, दि.०४/०९/२०१२

विषय - प्रभाग क्र.७८ मधील तापकीरनगर झोपडपट्टीमध्ये शौचालय बांधणेचे काम थेट पध्दतीने मे.सुलभ इन्टरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन या संस्थेस देणेबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ५५ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- २१/०९/२०१२ विभाग :- उद्यान
सुचक : मा. धनंजय आल्हाट अनुमोदक :- मा. नितीन लांडगे
संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.उद्यान/२/कावि/१२३५/२०१२, दि.०५/०९/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात सविस्तर नमुद प्रमाणे मनपाचे काही उद्यानांना नव्याने लागू करावयाचे प्रवेश फी व इतर बाबींची दरवाढ करणेस तसेच कार्यपध्दती / धोरण ठरविणेसमान्यता देणेकामी मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ५६ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- २१/०९/२०१२ विभाग :- विद्युत
सुचक : मा. आशा सुपे अनुमोदक :- मा. शैलजा शितोळे
संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.मुका/वि/जा/३३१/२०१२, दि.११/०९/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या प्रशासकीय इमारतीमधील अग्नीशमन यंत्रणेसाठी नवीन रींग मेन पाईप लाईन टाकणे व अनुषंगीक कामे करणेकामी येणा-या र.रु.१,३०,००,०००/- चे प्रशासकीय खर्चास तसेच काम करणेस मान्यता देणकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>**

ठराव क्रमांक :- ५७ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २१/०९/२०१२ विभाग :- प्रशासन
सुचक : मा. धनंजय आल्हाट अनुमोदक :- मा. नितीन लांडगे
संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/१/कावि/९८०/२०१२, दि.१३/०९/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दिनांक १६/०८/२०१२ रोजीच्या पदोन्नती निवड समितीची शिफारस विचारात घेता अर्हता धारण करणारे एकमेव वैद्यकीय अधिकारी डॉ. पवन वसंत साळवे यांना " अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी " या पदावर पे बॅन्ड र.रु. १५६०० - ३९१०० ग्रेड वेतन रु.७६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ५८ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २१/०९/२०१२ विभाग :- पाणीपुरवठा
सुचक : मा. शैलजा शितोळे अनुमोदक :- मा. सुमन नेटके
संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.डप्र/पापु/कावि/९७८/२०१२, दि.१७/०९/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जलक्षेत्र क्र.ड/१२ पिंपळे गुरव परिसरातील गुरुत्व वाहिनीवरील थेट पाणीपुरवठा बंद करणेकामी स.नं.७२ येथे २.० द.ल.लि.क्षमतेची टाकी बांधणेकामी येणा-या र.रु. १,३०,०००/- चे खर्चास व काम करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ५९ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २१/०९/२०१२ विभाग :- जकात
सुचक : मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा.धनंजय आल्हाट
संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.जकात/१०/कावि/२३९/२०१२, दि.१५/०९/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.महापालिका सभा ठराव क्र.१२३४ दिनांक १२/१२/२०११ अन्वये मान्यता दिल्याप्रमाणे " पिंपरी चिंचवड महानगरपालिका जकात नियम २००१ " चे अनुसुची १ मधील अ.क्र.८१ या नोंदीतील " सर्व प्रकारचे पुतळे व सर्व प्रकारच्या मुर्ती " या शब्दापुढे कंसात ( माती, चिकणमाती, शाडू तसेच प्लास्टर ऑफ पॅरिस पासून तयार केलेल्या देवदेवतांच्या मुर्ती वगळून ) अशी वाढीव नोंद घेण्यास व जकात नियम २००१ मधील अनुसूची २ मध्ये शेवटच्या क्रमांकानंतर पुढील क्रमांक देवून या नोंदीपुढे माती, चिकणमाती, शाडू तसेच प्लास्टर ऑफ पॅरिस पासून तयार केलेल्या देवदेवतांच्या मुर्ती अशी वाढीव नोंद घेणेस व तसा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ६० विषय क्रमांक :- ८
दिनांक :- २१/०९/२०१२ विभाग :- स्थापत्य ब प्रभाग
सुचक : मा. आशा सुपे अनुमोदक :- मा. शैलजा शितोळे
संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.स्था/बप्र/काअ/६/कावि/२९/२०१२, दि.१८/०९/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

चिंचवड येथील ॲटो क्लस्टर समोरील मनपाच्या आरक्षित जागेत प्रादेशिक विज्ञान केंद्र प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून नजिकच्या कालावधीत या प्रकल्पाचे उद्‌घाटन करण्याचे नियोजन आहे. सदर प्रकल्पाच्या मागील बाजूस उर्वरित सिमाभिंतीचे काम करणे अत्यावश्यक आहे. सदरचे कामाची तातडी व कामाच्या कालावधीचा विचार करुन सदर काम ब प्रभागामधील रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहा समोरील नाल्याचे रुंदीकरण करणे ( नि.क्र.३०/१-२०१०/११) या कामाच्या शिल्लक रकमेतून करण्यास व त्यास येणा-या र.रु.१५.०० लक्षचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ६१ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- २१/०९/२०१२ विभाग :- जलनिःसारण
सुचक : मा. आशा सुपे अनुमोदक :- मा. सुमन नेटके
संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.जनि/कावि/१००२/२०१२, दि.२१/०९/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सांगवी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत सांगवी मुळानगर येथे पंप हाऊसच्या मोकळया जागेत रिटेनिंगवॉल व सिमाभिंत बांधणेकामी येणा-या र.रु.९९,२२,०००/- खर्चास व कामकरणेस मान्यता देणकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ६२ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- २१/०९/२०१२
सुचक : मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा. शैलजा शितोळे
संदर्भ :- मा.जितेंद्र ननवरे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्र.५ मोरेवस्ती येथे दवाखाना इमारत बांधणेचे कामाचा आदेश मे. अभय कन्स्ट्रक्शन यांना सोपविणेत आलेला आहे. सध्या सदाशिव बहिरवाडे क्रिडांगण शाहुनगर क्रिडांगणाची खुपच दुरावस्था झालेली आहे. तरी वॉर्ड क्र. ५ मोरेवस्ती येथे दवाखाना इमारत बांधणेचे कामामधून शाहुनगर येथील बहिरवाडे क्रिडांगणाची दुरुस्तीची कामे तातडीने करुन घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( प्रसाद शेट्टी )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ १२१२/२०१२
दिनांक - २४ / ०९ / २०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.